ePaper

# मराठा आरक्षणाबाबत आज सर्वपक्षीय बैठक; कोंडी फोडण्याचा सरकारचा प्रयत्न




| वर्ष - 7 | अंक - 129 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 11 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- गॉफने पटकावले विजेतेपद!
- करीनानं केला राष्ट्रगीताचा अपमान!
- मी गीता, उपनिषदे वाचलीत!
- आम्ही नाव नाही पंतप्रधान बदलणार!

# शरद पवार गटाला शहराध्यक्ष मिळेना?

## » पिंपरी-चिंचवडमधील स्थिती : सुनील गव्हाणे, इम्रान शेख यांची झुंज एकाकी

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरद पवार हे दिल्ली दरबारी "महाराष्ट्रातील बलाढ्य नेता" अशी ओळख असलेला राज्यातील एकमेव नेता आहेत. 'इंडिया' ची बैठक नुकतीच मुंबईत झाली. त्यानिमित्ताने पवारांचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले. अशा मातब्बर नेत्याला पिंपरी-चिंचवड शहरात अद्याप शहराध्यक्ष गवसलेला नाही? यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**

राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी महायुतीसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे अजित पवार गट आणि शरद पवार गट असे दोन गट पडले. राष्ट्रवादीचे विद्यमान शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अजित पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. मात्र, विद्यार्थी सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, युवकचे प्रदेश कार्याध्यक्ष रविकांत वरपे, युवक सेलचे शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी शरद पवार यांच्यासोबत काम करण्याचा निर्णय घेतला. दि. २ जुलै २०23 रोजी राष्ट्रवादीत फुट पडली. त्यावेळीपासून पिंपरी-चिंचवडमध्ये शरद पवार गटाला अध्यक्ष मिळालेला नाही. महिला शहराध्यक्षपदाबाबतही तिच परिस्थिती आहे.

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचा शहरात जनसंपर्क मोठा आहे. त्यांनी अनेकदा शहराचा दौरा केला. कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण केले. विशेष म्हणजे, पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीनही मतदार संघात जयंत पाटलांचा थेट संपर्क आहे. पण, पक्षासाठी शहराध्यक्ष नियुक्त करण्याबाबत त्यांनाही अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.



### लवकरच शहराध्यक्ष निवड होईल : माधव पाटील

» दरम्यान, शहरातील शरद पवार समर्थक नवोदितांनी नुकतीच मुंबईत त्यांची भेट घेतली. शरद पवार गटाच्या शहर अध्यक्षपदाच्या निवडीच्या हालचालींना वेग आल्याचे सांगण्यात येत आहे. त्यासासाठी तीन प्रमुख चेहरे चर्चेत आहेत. यामध्ये माजी आमदार विलास लांडे, कामगार नेते अरुण बोऱ्हाडे आणि काशिनाथ जगताप यांचे नाव घेतले जात आहे. राष्ट्रवादीचे मुख्य प्रवक्ते माधव पाटील यांनी शरद पवार यांची भेट घेत शहराची राजकीय परिस्थिती सांगितली आणि लवकरात लवकर अध्यक्ष द्यावा याची मागणी केली. प्रदेशअध्यक्ष जयंत पाटील यांचीही त्यांनी भेट घेतली. पिंपरी-चिंचवड फादर बॉडीने आपले काम सुरु ठेवावे तसेच नवीन कार्यकर्त्यांना जोडून त्यांना पक्षाची जबाबदारी देण्याचे आदेश जयंत पाटील यांनी दिले. शहरला लवकरच अध्यक्ष दिला जाईल असे जयंत पाटील यावेळी सांगितले आहे, असा दावा माधव पाटील यांनी केला आहे.

### शहराच्या विकासात योगदान पण...




» पिंपरी-चिंचवड महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली. तत्पूर्वी स्व. खासदार अण्णासाहेब मगर शहराची पायाभरणी केली. हा परिसर हवेली मतदार क्षेत्र म्हणून ओळखला जात होता. त्यानंतर प्रा. रामकृष्ण मोरे, अजित पवार, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, सोपानराव फुगे, मोतीराव पवार, अशोक तापकीर, विलास लांडे, नानासाहेब शितोळे, तात्या कदम, अशोक कदम, योगेश बहल असे अनेक नेते पवारांच्या मुशीत तयार झाले. त्याकाळातील सुरेश कलमाडी, हर्षवर्धन पाटील आणि पंतगराव कदम यांच्यासारख्या कॉंग्रेसच्या दिग्गज नेत्यांकडील पिंपरी-चिंचवडचा कारभार राष्ट्रवादीने 'ताब्यात' घेतला. राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर १९९९ नंतर शहरात अजित पवार यांचा एकछत्री अंमल होता. पण, शरद पवार यांचा शब्द अंतिम मानला जात होता. दुसरीकडे, चाकण एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड एमआयडीसी, हिंजवडी आयटीहब, संत तुकाराम साखर कारखाना, अनेक शिक्षण संस्था उभा करण्यात शरद पवार यांचे योगदान आहे. तसेच, पिंपरी-चिंचवडला उद्योगनगरी, ऑटो हब असा लौकीक ज्यांच्यामुळे प्राप्त झाला ते शहराचे शिल्पकार शरद पवारच आहेत. शहरातील काही नेत्यांच्या घरात आजही शरद पवार यांच्या फोटोची पूजा केली जाते. असे असतानाही शरद पवार आज एकाकी असताना शहराला शहराध्यक्ष देता येत नाही, ही न रुचणारी बाब आहे.

# शिवसेनेतर्फे शहरात 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव'चा संकल्प

## » इरफान सय्यद यांचा पुढाकार : 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर मूर्ती उपलब्ध करणार!

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले आहे. घरगुती गणेशाची मूर्ती ही शाडूच्या मातीची किंवा साध्या मातीची असावी, असेही त्यांनी सुचविले आहे. त्या आवाहनाला प्रतिसाद देत शिवसेना उपनेते इरफान सय्यद यांच्या संकल्पनेतून गणेशभक्तांसाठी शहर शिवसेनेच्या वतीने " ना नफा ना तोटा " या तत्त्वावर पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.**



यामध्ये दगडूशेठ, सिंहासन, टिटवाळा, फेटा, मुकुट, अंभूजा या स्वरुपात गणेशमूर्ती उपलब्ध असणार आहेत. पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेच्या सहकार्यातून हे अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती शिवसेनेच्या माध्यमातून प्रसिद्धीस देण्यात आली आहे.इरफान यांनी म्हटले आहे की, "गणपती हे आराध्य दैवत म्हणून ओळखले जाते. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणरायाची विधिवत प्रतिष्ठापना करून त्याची मनोभावे पूजा केली जाते. कोणताही उत्सव साजरा करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी आपण सर्वांनी घेणे आवश्यक आहे.

शाडूच्या मूर्तीसाठी स्टॉलधारकांनी शिवसेनेचे दत्तात्रय भालेराव (8624866633), अरूण जोगदंड (9284049077), सुनील पवार (9421666900) यांच्याशी संपर्क साधावा, असे पत्रकात म्हटले आहे.



" गणेशोत्सवामधील पावित्र्य आणि पर्यावरण संरक्षण यासाठी गणेशोत्सव पर्यावरण पूरक पद्धतीने साजरा होणे ही काळाची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी आग्रही राहिले पाहिजे. प्रत्येकाने आपला दृष्टिकोन पर्यावरणस्नेही ठेवला तरच उत्सव साजरे करण्याबाबत सामाजिक परिवर्तन होऊ शकेल. यासाठी शिवसेनेच्या वतीने " ना नफा ना तोटा" या तत्त्वावर पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे पर्यावरणाची हानी न होता इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा होण्यास सर्वांचा हातभार लागेल आणि पर्यावरणाचे देखील रक्षण होईल, त्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा.

**–इरफान सय्यद, उपनेता,शिवसेना..**

# फलक लावून मुख्यमंत्री होता येत नाही!

## » मुख्यमंत्री होण्यासाठी 145 आकडा गाठणे आवश्यक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**फलक उभारून मुख्यमंत्री किंवा पालकमंत्री होता येत नाही. मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ जागांचा जादुई आकडा गाठावा लागतो, अजित पवार यांनी पुण्यात पत्रकारांनी बोलताना रविवारी दिली. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी हा आकडा गाठला. त्यामुळे त्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले. असेही अजित पवार यांनी सांगितले.**

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी होऊन उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या अजित पवार यांचा शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रविवारी रोड शो आयोजित करण्यात आला होता. रोड शो पूर्वी त्यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शन घेतले. अजित पवार यांच्या रोड शो निमित्ताने भावी मुख्यमंत्री असे त्यांच्या नावाचे फलक उभारण्यात आले होते.

यासंदर्भात त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. 'मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ हा जादुई आकडा गाठणे आवश्यक असते. जो हा आकडा गाठतो तो मुख्यमंत्री होतो. फलक उभारून कोणी भावी मुख्यमंत्री होत नाही. अलीकडे फलक उभारण्याचे नवा प्रकार उदयास येत आहे. काही दिवसांपूर्वी राज ठाकरे, पंकजा मुंडे यांचे फलक लागले आहेत. मुंबई येथील राष्ट्रवादी भवनाच्या बाहेर माझे, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांचे असेच फलक लागले होते.

फलक लावण्यास कोणी नेते सांगत नाहीत,' असे पवार यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणाच्या तिढ्याबाबत बोलताना ते म्हणाले की, राज्य सरकारकडून अर्जुन खोतकर यांनी मनोज जरांगे पाटलांची भेट घेतली. त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र अद्याप त्यावर तोडगा निघालेला नाही. या विषयावर विरोधी पक्षाची बाजू जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी सोमवारी बैठक बोलवली आहे. ओबीसी, कुणबी समाजाला न दुखवता मराठा समाजाला आरक्षण कसे देता येईल, याबाबत बैठकीत चर्चा होणार आहे. दरम्यान, अजित पवार यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेतेल. यावेळी शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. पगडी घालून अजित पवार यांनी शहराच्या विविध भागात रोड शो केला. त्यावेळी त्यांच्यावर फुलांची उधळण करण्यात आली. रोड शोमुळे धनकवडी परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या. दरम्यान, खेड शिवापूर येथे रोड शो समारोप झाला.



### जो हा आकडा गाठतो तो मुख्यमंत्री

» 'मुख्यमंत्री होण्यासाठी १४५ हा जादुई आकडा गाठणे आवश्यक असते. जो हा आकडा गाठतो तो मुख्यमंत्री होतो. फलक उभारून कोणी भावी मुख्यमंत्री होत नाही. अलीकडे फलक उभारण्याचे नवा प्रकार उदयास येत आहे. काही दिवसांपूर्वी राज ठाकरे, पंकजा मुंडे यांचे फलक लागले आहेत. मुंबई येथील राष्ट्रवादी भवनाच्या बाहेर माझे, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांचे असेच फलक लागले होते. फलक लावण्यास कोणी नेते सांगत नाहीत,' असे पवार यांनी स्पष्ट केले.

# जागतिक आजी आजोबा दिवस!

## » शाळकरी विद्यार्थी रमले कार्यशाळेत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सतत उपक्रमशीलता, हा पुणे शहराचा स्थायीभाव आहे. विविध निमित्ताने पण औचित्य साधून अभिनव स्वरूपाचे निरनिराळे उपक्रम घडवून आणण्यासाठी पुणेकर सदैव तत्पर असतात. याचे उदाहरण म्हणजे रविवारी साजरा झालेला 'जागतिक आजी आजोबा दिवस '.**

आज जागतिक ग्रँड पेरेंट्स डे च्या निमित्ताने डीएस प्री प्रायमरी च्या विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांबरोबर धमाल करत एका वेगळ्या आनंदाची अनुभूती घेतली. पुण्यातील प्रसिद्ध सारसबागेत सारे विद्यार्थी आजी आजोबा यांच्यासोबत एकत्र आले.

तिथे सगळ्यांनी मिळून मजा केली. आजी आजोबा मुले व टीचर्सनी मिळून अथर्वशीर्षाचे पठण केले. गणपतीची आरती म्हटली. तसेच डी इ एस मातृ मंदिरच्या विद्यार्थ्यांनी आजी आजोबांसमवेत सारसबागेच्या गणपतीच्या समोर शाडूमातीचा गणपती बनवण्याच्या कार्यशाळेत आनंदाने सर्वांनी सहभाग घेतला. शाडू मातीच्या गणेशमूर्ती घडवण्याची कार्यशाळा विशेष उत्साहात पार पडली. शाडू मातीतून आखीव रेखीव गणपती विद्यार्थी आणि आजी - आजोबांनी बनविले. तसेच यानिमित्ताने शिक्षकांनी खास आजी आजोबा आणि मुलांसाठी हास्य क्लबचे आयोजन केले होते.



### आजी-आजोबांसोबत नातवांनी केली धमाल

» आज जागतिक ग्रँड पेरेंट्स डे च्या निमित्ताने डीएस प्री प्रायमरी च्या विद्यार्थ्यांनी आजी-आजोबांबरोबर धमाल करत एका वेगळ्या आनंदाची अनुभूती घेतली. पुण्यातील प्रसिद्ध सारसबागेत सारे विद्यार्थी आजी आजोबा यांच्यासोबत एकत्र आले. तिथे सगळ्यांनी मिळून मजा केली. आजी आजोबा मुले व टीचर्सनी मिळून अथर्वशीर्षाचे पठण केले. गणपतीची आरती म्हटली. तसेच डी इ एस मातृ मंदिरच्या विद्यार्थ्यांनी आजी आजोबांसमवेत सारसबागेच्या गणपतीच्या समोर शाडूमातीचा गणपती बनवण्याच्या कार्यशाळेत आनंदाने सर्वांनी सहभाग घेतला.

त्याच्यातदेखील आजी आजोबांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सगळ्यांनी चहापानाचा आस्वाद घेऊन विस्तीर्ण सारसबागेला एक फेरी मारून या अनोख्या उपक्रमाची सांगता करण्यात आली.

सुमारे 300 आजी आजोबांनी या उपक्रमात विद्यार्थ्यांच्या जोडीने सहभाग घेतला. या सर्व कार्यक्रमाची संकल्पना मुख्याध्यापिका माधुरी बर्वे यांची होती. या उपक्रमाच्या निमित्ताने मुलांना नात्यांचा जिव्हाळा, माया, आपुलकी यांचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न केला, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# गरजूंसाठी मूर्ती आमची किंमत तुमची : उपक्रम

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

सध्या सगळीकडे सुंदर रंगानी सजवलेल्या विविध आकाराच्या गणपती बाप्पांच्या मोहात पाडणाऱ्या मूर्ती दिसत आहेत. पण या मूर्तींची किंमत अनेकांना परवडणारी नसते. लहान मुलांचा देखील हट्ट असतोच की मोठी बाप्पांची मूर्ती हवी. या गोष्टींचा विचार करीत पुण्यातील प्रल्हाद गवळी मित्र परिवार तर्फे 'मूर्ती आमची किंमत तुमची' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.

मनसेचे शहर संघटक प्रल्हाद गवळी यांनी रविवार पेठेत हा उपक्रम राबविला आहे. उपक्रमाची सुरुवात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या हस्ते गणरायाची आरती करून झाली. त्यांच्या हस्ते प्रतिनिधिक स्वरूपात पाच नागरिकांना गणेश मूर्ती देण्यात आल्या. यंदा 7 हजार 500 गणेश मूर्ती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या गणेशमूर्ती असून नागरिकांनी मूर्तीची किंमत ठरवून कलशामध्ये ती रक्कम टाकायची आहे. साईनाथ चकोर, हेमंत कंठाळे, नरेश देवकर, जीवन गायकवाड, विक्रम लगड, गौरव गवळी, भाई कात्रे, श्रीराज पवार, विकास गवळी यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले.प्रल्हाद गवळी म्हणाले, कोविड काळापासून 'मूर्ती आमची किंमत तुमची' या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. उपक्रमाचे यंदा तिसरे वर्ष आहे. या उपक्रमाला लोकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. हल्ली गणेश मूर्तींच्या किमती वाढल्या आहेत. अनेक कुटुंबांना या मोठ्या मूर्ती घेणे शक्य होत नाही, पण मोठ्या मूर्ती घेण्याचा मुलांचा हट्ट असतो. यामुळे मूर्ती आमची किंमत तुमची या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. कोणाकडे पैसे नसतील तर विनामूल्य मूर्ती देखील देण्यात येते. लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाष चंद्र बोस सैनिकी शाळेच्या १०१ विद्यार्थ्यांनी राज ठाकरे यांचे लाईव्ह चित्र यावेळी काढले. यावेळी आदिमाया ढोल ताशा पथक लोकसेवा प्रतिष्ठान संचलित नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या पथकाने वादन केले.

# मावळात मनसेची मोर्चेबांधणी!

## नियोजन बैठकीत निर्णय : 'राज'आदेशाप्रमाणे जोमाने काम करू!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मावळ लोकसभा मतदार संघात पक्षाध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशाप्रमाणे जोमाने काम करू, असा संकल्प मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला.**



मावळ लोकसभा नियोजन बैठक पार पडली. या बैठकीसाठी पिंपरी विधानसभा, चिंचवड विधानसभा, मावळ विधानसभा, पनवेल विधानसभा, उरण विधानसभा, या सर्व विधानसभेतील प्रमुख पदाधिकारी, जिल्हा अध्यक्ष, तालुका अध्यक्ष, उपजिल्हाध्यक्ष , शहर प्रमुख, उपशहर अध्यक्ष,विभाग अध्यक्ष, व विविध संघटनेच्या शहराध्यक्ष उपशहर अध्यक्ष उपस्थित होते. तसेच, जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील, संदेश ठाकूर, आदिती सोनार, सपना राऊत, प्रसिद्ध अभिनेते संजय नार्वेकर उपस्थित होते. मावळ लोकसभेची पहिली बैठक मावळातील वरसवली गाव या ठिकाणी पार पडली. मावळ लोकसभेच्या संघटकपदी रणजित शिरोळे, अमयखोपकर यांची समन्वय संघटक आणि सचिन चिखले यांची निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांचे अध्यक्षतेखाली आज बैठक पार पडली. यामध्ये विधानसभेची बांधणी , कार्यकर्त्यांच्या नियुक्तया, पक्ष संघटना, भविष्यात होणारे मेळावे, त्याचप्रमाणे पदाधिकारी यांच्या अडीअडचणी याविषयी प्रमुख मार्गदर्शन मावळ लोकसभेचे संघटक रणजित दादा शिरोळे व मावळ विधानसभेच्या समन्वयक अमेय खोपकर यांनी केले. पुढे मावळ लोकसभा जिंकायचीच या उद्देशाने सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने लागा. मावळ लोकसभेतील नागरिकांच्या घरोघरी पोहचा लोकांच्या अडीअडचणी सोडवा त्या दृष्टिकोनातून आदेश देण्यात आले. पक्षातील हेवेदावे सर्व सोडा व मावळ लोकसभा जिंकण्याच्या दृष्टिकोनातून कामाला लागा असेही खोपकर यांनी सांगितले.

### राजसाहेब देतील तो आदेश पूर्ण करूया: सचिन चिखले

**मावळ लोकसभेतील चिंचवड विधानसभा, पिंपरी विधानसभा, मावळ विधानसभा, पनवेल विधानसभा, उरण विधानसभा, कर्जत विधानसभा या सर्व विधानसभेप्रमाणे सर्व प्रमुख पदाधिकारी व मनसैनिकांच्या बैठका होतील. व प्रत्येक विधानसभेप्रमाणे मेळावे होतील असे रणजित शिरोळे व अमय खोपकर यांनी सांगितले आहे. मावळ लोकसभेतील सर्व प्रमुख सामाजिक संघटना, प्रमुख मंडळे, प्रतिष्ठित व्यक्ती यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी भेटीगाठी वाढवा व मावळ लोकसभेत एक नवा इतिहास घडवा, असे आवाहन रणजित शिरोळे यांनी केले. तसेच, राजसाहेब जो आदेश देतील. तो पूर्ण करण्यासाठी जोमाने कामाला लागूया, असे आवाहन सचिन चिखले यांनी केले.**

---

# आरोग्य मंत्र्यांकडून "मानव सेवा हिच ईश्वर सेवा" चा संदेश!

## भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या भावना : प्रा. डॉ. तानाजी सावंत, प्रा. शिवाजी सावंत यांचे अभिनंदन

। पिंपरी ।महाईन्यूज ।

**महाराष्ट्र राज्याचा आरोग्य विभाग आणि पुणे, सातारा आणि सोलापूर या तीन जिल्हा परिषदांच्या आरोग्य विभागाच्यावतीने यंदाच्या आषाढी वारीनिमित्त 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत आरोग्य वारीत ११ लाखांहून अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात आले. मानव सेवा हिच ईश्वर सेवा असा संदेश आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांनी दिला आहे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केल्या आहेत.**

राज्याचे आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत व प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून आषाढी वारी निमित्त पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या "आरोग्याची वारी पंढरीच्या दारी" महाआरोग्य शिबिराची आंतरराष्ट्रीय स्तरावर नोंद घेण्यात आलेली आहे व त्याबद्दल त्यांना INTERNATIONAL WORLD RECORD OF EXCELLENCE, BOOK OF RECORDS वतीने सन्मानित करण्यात आले आहे. पंढरपूर येथे आषाढी एकादशी सोहळ्यानिमित्त सार्वजनिक आरोग्य विभागाने वारकऱ्यांची आरोग्य तपासणीचा 'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी' उपक्रम राबविला होता. महाराष्ट्राच्या सक्षम आणि सुदृढ आरोग्यासाठी कार्य करत असलेले आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत व प्रा. श्री. शिवाजीराव सावंत यांचे कार्य खरंच कौतुकास्पद असल्याने राज्याच्या जनतेकडून आणि पांडुरंगाच्या वारकऱ्यांकडून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



### एकूण 11 लाख 57 हजार वारकऱ्यांची सेवा...

**आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर दरम्यान निघालेल्या पालखी मार्गावर 6 लाख 64 हजार 607, तर पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरांमध्ये 5 लाख 77 अशा एकूण 11 लाख 57 हजार 684 वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचारात्मक आरोग्य सेवा पुरवून सार्वजनिक आरोग्य विभागाने विक्रमी कामगिरी केली होती. देहू-आळंदी ते पंढरपुर या पालखी मार्गावर आणि पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी 27 ते 29 जून 2023 या कालावधीत वाखरी, गोपाळपूर व तीन रस्ता येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरांच्या माध्यमातून आरोग्य विभागामार्फत विविध आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात आल्या होत्या त्याच सेवा कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.**

# नव्याने तयार होत असलेल्या प्रकल्पांची अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्याकडून पाहणी

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्याने तयार होत असलेल्या इमारतीचे काम आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचनेनुसार मुदतीत पूर्ण करण्यात यावे तसेच प्रत्येक कामगार, अधिकारी कामावर असताना सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे असे निर्देशही अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी संबंधित अधिका-यांना दिले.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी आज नव्याने तयार होत असलेल्या महापालिका नवीन प्रशासकीय इमारतीच्या कामाची तसेच भक्ती शक्ती ते मुकाई चौक आणि मुकाई चौक ते भोंडवे कॉर्नर या रस्त्यांची आणि रावेत येथील रेल्वे उड्डाण पुलाच्या कामांची पाहणी केली त्यावेळी त्यांनी निर्देश दिले. प्रकल्पांच्या पाहणीच्या वेळी त्यांचे समवेत सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड,उप अभियंता विजयसिंह भोसले,कनिष्ठ अभियंता संतोष कुदळे आणि केतकी कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी महापालिका नवीन इमारतीच्या खोदकामाची पाहणी करून प्रकल्पाची संपूर्ण माहिती घेतली. सहशहर अभियंता ओंभासे यांनी नवीन इमारतीस ३६ महिने लागणार असून सुरू असलेल्या कामाबाबत माहिती दिली.

त्यानंतर अतिरिक्त आयुक्त यांनी रावेत येथील रेल्वे उड्डाण पुलाच्या कामांची सखोल माहिती घेतली. सह शहर अभियंता ओंभासे यांनी मुख्यत्वेकरून जमीन अधिग्रहण करण्यात झालेला विलंब यामुळे या प्रकल्पाचे काम थांबले होते परंतू आता सदर काम वेगाने सुरू असून पुढील तीन महिन्यात काम पूर्ण होईल असे सांगितले. त्यानंतर कार्यकारी अभियंता बापुसाहेब गायकवाड यांनी रावेत येथील उड्डाण पूल ते मुकाई चौक या रस्त्यांची विकास मंजूर आराखड्यातील ४५ मीटर रुंदीप्रमाणे अद्यापही काही जागा ताब्यात नसल्याने या रस्त्याचे कामास विलंब झाल्याचे सांगितले.




# एक देश, एक पक्ष’ हाच उद्देश!

**तुम्हाला सगळ्यात जास्त काळजी वाटते अशी कोणतीही एक गोष्ट कोणती असे मी लोकांना विचारल्यावर बहुतेकांना दोन किंवा तीन गोष्टी सांगायच्या होत्या. हे समजण्यासारखेच आहे. कोणतीही आई महागाई ही एकच काळजीची गोष्ट वाटते असे कसे सांगेल?**

तिच्या दृष्टीने तिच्या मुलाची सुरक्षितता हीदेखील तेवढीच चिंतेची बाब नाही का? एखादा कर्मचारी नोकरी टिकणे ही एवढी एकच काळजी आहे असे कसे सांगेल? त्याच्या परिसरात असलेले स्फोटक वातावरण आणि हिंसक जमाव ही गोष्ट तो कशी विसरेल? एखाद्या एक तरुण जोडप्याच्या दृष्टीने त्यांच्या नातेसंबंधाला त्यांच्या पालकांची संमती मिळणे एवढी एकच गोष्ट कशी महत्त्वाची असेल? तथाकथित नैतिक पोलिसांच्या हल्ल्याची भीती ते कसे काय विसरतील? या प्रश्नांची उत्तरे आपल्याला लोकांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या समस्यांची आठवण करून देतात. एखादा देश विकास, आर्थिक समृद्धी, मानवी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक प्रगती, समता आणि बंधुता या मार्गाने जातो आहे, हे निश्चित करण्यासाठी तिथे लोकशाही राज्यपद्धती आहे का हे पाहण्याला गेल्या अडीचशे वर्षांमध्ये प्राधान्य दिले जाते. ही उद्दिष्टे जिथे एकच संस्कृती आहे अशा जपानसारख्याच नाही तर जिथे बहुविध संस्कृती आहेत अशा



अमेरिका आणि भारतासारख्या देशातही आव्हानात्मक ठरतात. पण एकसंध तसेच नि:स्वार्थी लोकांचे आणि सर्व लोकांसाठी चालवले जाणारे सरकार असणे या मार्गानेच हे आव्हान पेलले जाऊ शकते, असे मला वाटते. वेगवेगळ्या देशांनी वेगवेगळ्या राज्यपद्धती स्वीकारल्या आहेत. चीनमध्ये एकपक्षीय, वर्चस्ववादी सरकार आहे; रशियामध्ये लष्करी तसेच विस्तारवादी सरकार आहे. म्यानमार आणि अनेक देश लष्करी हुकूमशाही पद्धतीने चालतात; इराण, अफगाणिस्तान आणि इतर देश एक ईश्वरशासित, धर्म-प्रेरित पद्धतीने देश चालवतात; अमेरिकेत अध्यक्षीय लोकशाही आहे. पण तिथे सत्तेचे विकेंद्रीकरण आहे आणि सत्तासमतोल साधलेला आहे; युरोपातील बहुतेक देश, तसेच ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि कॅनडामध्ये संसदीय लोकशाहीच्या ब्रिटिश प्रारूपाचे अनुसरण केले जाते. भारतानेही लोकशाहीचे ब्रिटिश प्रारूप स्वीकारले. भारतात लोक, संस्कृती, प्रथा-परंपरा, या सगळ्याबाबत जेवढे वैविध्य आहे, तेवढे जगात कुठेच नाही. अशा अनेक वंश, धर्म, जाती, भाषा, इतिहास आणि संस्कृती आणि चालीरीती असलेल्या देशात सर्व लोकांना प्रतिनिधित्व देण्यासाठी यापेक्षा चांगला मार्ग असू शकत नाही. ब्रिटिश प्रारूपच आपल्यासाठी आजही सर्वोत्तम आहे, असे माझे मत आहे. सध्याचे राज्यकर्ते म्हणजे भाजप, त्याचे मित्रपक्ष आणि भाजपचे छुपे समर्थक – हे सगळे मिळून बरोबर याच्या विरुद्ध प्रकारचे प्रारूप मांडत आहेत. त्यांच्या मते सगळी भारतीय जनता एक आहे आणि समाजात असलेले सर्व मतभेद या एकत्वामध्ये विलीन केले पाहिजेत. आपला इतिहास तसेच गेल्या ७५ वर्षांतील अनुभवांपुढे त्यांचा हा सिद्धांत टिकत नाही, हा युक्तिवाद ते उडवून लावतात. आणि भाषा, अन्न, पोशाख, सामाजिक वर्तन आणि अगदी वैयक्तिक कायदे आणि चालीरीतींपर्यंत सगळे एकच हवे अशी भाषा करतात. म्हणून, भारतात हिंदीपेक्षा जुन्या आणि प्राचीन व्याकरण आणि समृद्ध साहित्य असलेल्या अनेक भाषा असल्या तरीही हिंदी हीच भारताची भाषा असेल, असे त्यांचे म्हणणे असते. त्याबरोबरच त्यांच्या मते शाळा-महाविद्यालयांमध्ये बहुसंख्यांचा असेल तोच पेहराव सर्वांसाठी असेल. बहुसंख्यांचे असेल तेच भोजन सर्वांसाठी असेल. आंतरजातीय आणि आंतर-धर्मीय विवाहांना परवानगी देणारे कायदे रद्द केले जातील. नैतिक पोलिसांना तरुण जोडप्यांच्या सामाजिक वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी खुला परवाना असेल. एकसमान नागरी संहिता (UCC) अल्पसंख्याक आणि आदिवासींच्या प्रथा आणि वैयक्तिक कायदे रद्द करेल. तसेच, यातून मनरेगामध्ये काम करणाऱ्यांना मजुरी देण्यासाठी आधार आधारित पेमेंट प्रणालीचे पालन करणे अनिवार्य करण्याचाही हेतू आहे. यासंदर्भात ‘वायर’ने दिलेल्या बातमीनुसार, मनरेगा योजनेच्या वेबसाइटवर २८ ऑगस्ट २०२३ रोजी दिलेल्या माहितीवरून असे दिसून आले आहे की त्यामुळे एकूण १४.३४ कोटी नोंदणीकृत सक्रिय मजुरांपैकी ११.७२ कोटी मजुरांनाच मजुरी मिळू शकेल. २० टक्के मजुरांना रोजगार मिळणार नाही. लक्षात घ्या, ते सगळ्यात गरीब आहेत कारण त्यांना त्यांच्या घराजवळ दुसरे कोणतेही काम मिळत नाही.

## संपादकीय »

# देश की धरती..

***राष्ट्पती द्रौपदी मुर्मू यांनी स्वत:स ‘प्रेसिडेंट ऑफ इंडिया’ऐवजी ‘प्रेसिडेंट ऑफ भारत’ असे संबोधण्यास सुरुवात केल्याने बाकी जनरल सॉ मॉंग आणि रिसेप तय्यीप एर्दोगान या महानुभावांस निश्चितच आनंद होईल.***

राष्ट्पती द्रौपदी मुर्मू यांनी स्वत:स ‘प्रेसिडेंट ऑफ इंडिया’ऐवजी ‘प्रेसिडेंट ऑफ भारत’ असे संबोधण्यास सुरुवात केल्याने बाकी कोणास नाही तरी महान अभिनेते मनोजकुमार, जनरल सॉ मॉंग आणि रिसेप तय्यीप एर्दोगान या महानुभावांस निश्चितच आनंद होईल. चित्रपटात आदर्श, सज्जन, स्वप्नवादी अशा व्यक्तिरेखेसाठी ‘भारत’ हे नाव मनोजकुमार यांस योग्य वाटले. तेव्हापासून भारत याच नावाने ते ओळखले जाऊ लागले.

अशा तऱ्हेने चांगुलपणाची ओळख भारत या नावाने करून देण्यास त्यांनी सुरुवात केली. आपल्या राष्ट्पतींनी आणि अर्थातच केंद्र सरकारातील अनेकांनी लहानपणी मनोजकुमार यांचे चित्रपट मोठ्या प्रमाणावर पाहिले असणार. त्याशिवाय का ते इतके संस्कारी झाले? त्यामुळेच तेव्हापासून या मंडळींच्या डोक्यात इंडियाचे नाव भारत असे असावे असे घोळत असणार.

**आयआयटी मुंबईच्या संगणकशास्त्र विभागातील प्राध्यापक मिलिंद सोहोनी यांचा २०२२ च्या एप्रिलमध्ये फोन आला, “सध्याच्या उच्च शिक्षण संस्थांमधली शिक्षणपद्धती तरुणांना रोजगारक्षम बनवणारी नाही. पदवीधरांना नोकऱ्या निर्माण करायच्या असतील तर उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल होणं आवश्यक आहे. आपल्या परिसराचा विश्लेषणात्मक अभ्यास हा शिक्षणाचा भाग होण्याला पर्याय नाही.**


# रोजगाराची नाळ जोडण्याचा प्रयत्न!

जवळच्याच एका गावातल्या काजू फॅक्टरीवर मी मला जमेल तसा एक केस स्टडी केला. त्यानंतर प्रा. मिलिंद सोहनी आणि आयआयटी मुंबईशी संलग्न असलेले राजाराम देसाई यांच्यासोबत त्यासंदर्भात चर्चा झाली. यातूनच जून २०२२ मध्ये कोकणात शिक्षणक्षेत्रातल्या “आपले प्रश्न, आपले विज्ञान!” या एका नव्या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली. हा आयआयटी मुंबई आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या ‘उन्नत महाराष्ट्र अभियान’ प्रकल्पाचा एक भाग. हा प्रकल्प २०१६ पासून महाराष्ट्राच्या विविध भागांत कार्यरत आहे. आयआयटी मुंबईच्या ‘सेंटर फॉर टेक्नॉलॉजिकल अल्टर्नेटिव्ह्ज इन रुरल एरिया’ (उळअफअ) या विभागांतर्गत याआधी मुख्यत: अभियांत्रिकी क्षेत्राशी संबंधित असलेला हा प्रकल्प आता सामान्य पदवी महाविद्यालयांमध्येही सुरू झाला आहे. आपल्या परिसराकडे अभ्यासात्मक दृष्टीने बघण्याची आणि



परिसरातल्या गोष्टींचं, गावातल्या प्रश्नांचं विश्लेषण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणं हा या उपक्रमाचा मूळ उद्देश. आज पदवीधर मोठ्या प्रमाणावर बेरोजगार आहेत. आयआयटी, आयएमसारख्या उच्च शिक्षण संस्था एक ते दोन टक्के हुशार विद्यार्थ्यांना नोकऱ्या देऊ शकतात. परंतु बाकी सामान्य विद्यार्थ्यांचं काय? गावांतले शेती आणि छोटे उद्योग धोक्यात आले आहेत. पण दुसऱ्या बाजूला आज खेडेगावांमध्ये लोक दैनंदिन जीवनात अनेक प्रश्नांचा सामना करत आहेत. चांगले रस्ते नाहीत, पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना पायपीट करावी लागते. एसटी वेळेवर येत नाही. मुलांना शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची सोय नाही. शेती परवडत नाही. छोट्या व्यवसायांच्या वाढीसाठी अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध नाही. म्हणजेच समाजात “गरजा” भरपूर आहेत आणि दुसऱ्या बाजूला आजचा पदवीधर तरुण वर्ग बेरोजगार आहे. ही विसंगती निर्माण झाली आहे कारण आपल्या शिक्षणपद्धतीत उच्च शिक्षण आणि सामाजिक गरजा यांची सांगड घातली गेलेली नाही. समाजातल्या प्रश्नांचा विश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यास स्थानिक उच्च शिक्षण संस्थांकडून, म्हणजेच विद्यार्थ्यांकडून केला गेला तर या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी जी काही यंत्रणा स्थानिक पातळीवर निर्माण होईल त्यात तरुणांना भरपूर रोजगार निर्माण होऊ शकतील. “अ प्रॉब्लेम वेल डिफाइन्ड इज द प्रॉब्लेम हाफ सॉल्व्ड” या उक्तीप्रमाणे, तालुक्याचा एसटी डेपो तोटय़ात असेल, तर त्याचा विश्लेषणात्मक अभ्यास केला जाईल तेव्हा तो फायद्यात कसा आणायचा याचे उपाय सापडू शकतील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कोणाच्या बापाची हिंमत आहे, जो हिंदू धर्म नष्ट करेन : फडणवीस

## » हिंदू धर्माला मलेरिया म्हणणाऱ्यांना उद्धव ठाकरेंना साथ

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**या देशावर ज्यांनी आक्रमण केले, ते संपले. पण हिंदू धर्म कधी संपला नाही. कुणाच्या बापाची हिंमत आहे, जो हिंदू धर्म नष्ट करू शकेल. द्रमूकचे नेते उदयनिधी स्टॅलिन जर हिंदू धर्म संपविण्याची भाषा बोलत असतील, तर त्यांना त्यांची जागा दाखवावी लागेल. दुसरीकडे हिंदू धर्माला डेंग्यू, मलेरिया म्हणणाऱ्या उदयनिधी स्टॅलिनचे वडील एम. के. स्टॅलिन यांच्या बाजूला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बसतात.**

ते आता कुणाच्या सोबत आहेत, हे लोकांना कळले आहे. त्यांना आता नक्कीच घरी पाठवावे लागेल, असा टोला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला. ते अमरावती येथे खासदार नवनीत राणा यांच्या वतीने आयोजित दहीहंडी कार्यक्रमात बोलत होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भगवान श्रीकृष्ण हे तर अमरावती जिल्ह्याचे जावई आहेत.

तयांच्या जन्मोत्सवात आम्ही विकासाचा, प्रेमाचा काला घेऊन आलो आहोत. गेल्या सत्तर वर्षांत जितका निधी अमरावती जिल्ह्याला मिळाला नाही, तेवढा निधी आमच्या सत्ताकाळात मिळाला. अमरावतीतील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विमानतळ विकास, मेगा टेक्सटाईल पार्क, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात क्रीडा विद्यापीठ, रिद्धपुरात मराठी भाषा विद्यापीठ, रस्त्यांची 2 हजार कोटी रुपयांची कामे हा विकासाचा ओघ असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.



यावेळी चित्रपट अभिनेत्री शिल्पा शेट्टी, अभिनेते राजपाल यादव, खासदार नवनीत राणा, डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा आदी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जरी काही लोकांनी हनुमान चालिसा म्हणण्यासाठी नवनीत राणा यांना जेलमध्ये टाकले. पण त्यांना काही लाभ झाला नाही. परंतू या देशात केवळ भगवान राम चालतील, हनुमानजी चालतील अन् छत्रपती शिवाजी महाराज चालतील. भारत माता की जय असा जयघोष केल्यानंतर फडणवीस म्हणाले की, भारत माता म्हणण्यास किती चांगले वाटते. इंडिया माता म्हणणं मनाला चांगल वाटतं का? असा प्रश्न उपस्थित करुन सभेतील लोकांनी त्यास उत्तर दिले नाही नाही. 'भारत माता की जय' असा जयघोष करायला किती चांगले वाटते.

पण इंडिया माता असं म्हणण पटतं का? असा उपरोधिक सवाल देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. तर त्यांनी अप्रत्यक्ष विरोधी पक्षांना टोला लगावला आहे. इंडियाचे नाव बदलून भारत करण्यासंदर्भात जे राष्ट्रीय स्तरावर राजकारण सुरू आहे. त्यावरून विरोधक अन् सत्ताधाऱ्यांमध्ये सुरू असलेल्या वादात आता फडणवीसांनी देखील उडी मारली.

### अमरावतीला सर्वात जास्त निधी

» देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भगवान श्रीकृष्ण हे तर अमरावती जिल्ह्याचे जावई आहेत. त्यांच्या जन्मोत्सवात आम्ही विकासाचा, प्रेमाचा काला घेऊन आलो आहोत. गेल्या सत्तर वर्षांत जितका निधी अमरावती जिल्ह्याला मिळाला नाही, तेवढा निधी आमच्या सत्ताकाळात मिळाला. अमरावतीतील प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विमानतळ विकास, मेगा टेक्सटाईल पार्क, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात क्रीडा विद्यापीठ, रिद्धपुरात मराठी भाषा विद्यापीठ, रस्त्यांची 2 हजार कोटी रुपयांची कामे हा विकासाचा ओघ असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. यावेळी चित्रपट अभिनेत्री शिल्पा शेट्टी, अभिनेते राजपाल यादव, खासदार नवनीत राणा, डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा आदी उपस्थित होते.

# आम्ही नाव नाही पंतप्रधान बदलणार!

## » जालियनवाला घडले तसे जालनावाला घडले : उद्धव ठाकरे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी जळगावमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. यावेळी त्यांनी भाजपसह शिंदे गटावर चौफेर टीका केली. उद्धव ठाकरे म्हणालेकी, काही लोकांच्या डोक्यात हवा गेली. त्या हवेच्या जोरावर हे फुग्यासारखे हवेत गेले आहेत.**

त्या फुग्यांना टाचणी लावण्याचे काम तुम्हा सर्वांना करायचे आहे. दरम्यान उद्धव ठाकरे म्हणाले की, केंद्र सरकार डगमगायला लागले आहे. केंद्र सरकार हालायला लागले आहे. मला माझ्या महापौर आणि उपमहापोरांसह इतर सहकाऱ्याचा अभिमान आहे. पोलादी पुरुष केवळ नावाचे नाही तर कामाचे, नाव लावून कुणी काही करु शकेत असे म्हणत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, सत्ता आली काय गेली काय? मी सत्तेसाठी धडपडत नाही. देशाचे नेतृत्व करण्याची स्वप्न मला पडत नाही. जागे करण्याचे काम मला वंश परंपरेने आले असल्याचे ठाकरे म्हणाले. ते पुढं म्हणाले की, सातत्याने टीका करण्यात येते की, शिवसेनेची कॉंग्रेस होईल. 25 वर्षे भाजपसोबत राहून शिवसेनेची भाजप झाली नाही. तशीच कॉंग्रेससोबत जावून शिवसेनाची कॉंग्रेस होऊ देणार नाही. उद्धव ठाकरे म्हणाले की, जेव्हा कॉंग्रेसचे सरकार होते तेव्हा हिंदू खतरेमें अशा घोषणा देत होते. आता यांचे नऊ वर्षे सरकार आहे तरी यांना कश्मीरमधील हिंदू पंडीतांना परत आणता आले नाही. आता तर यांना यांचे सरकार नव वर्षे असताना हिंदू आक्रोश मोर्चा काढावा लागतोय हे दुर्देव असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे. की, मराठा आंदोलनात मनोज जरांगे आंदोलनाला बसले आहेत त्यांना भेटायला मुख्यमंत्र्यांना वेळ नाही. परंतू मुख्यमंत्र्यांना दिल्लीला जायला वेळ आहे. असा अमानुष अत्याचार जालियनवाला येथे झाला होता आता नवा जालनावाला घडविला आहे, अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, जळगावात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपावर तिखट भाषेत टीका केली आहे. आम्ही आमची कॉंग्रेस होऊ देणार नाहीच, पण भाजपा कमळाबाईची पालखी देखील वाहणार नाही, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली आहे.



### जरांगेंना भेटायला वेळ नाही

» उद्धव ठाकरे म्हणाले की, मराठा आंदोलनात मनोज जरांगे आंदोलनाला बसले आहेत त्यांना भेटायला मुख्यमंत्र्यांना वेळ नाही. परंतू मुख्यमंत्र्यांना दिल्लीला जायला वेळ आहे. असा अमानुष अत्याचार जालियनवाला येथे झाला होता आता नवा जालनावाला घडविला आहे, अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

# मी गीता, उपनिषदे वाचलीत!

## » युरोपात जाऊन राहुल गांधींचा मोदींवर निशाणा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कॉंग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी सध्या युरोप दौऱ्यावर आहेत. परदेशात जाऊन त्यांनी पुन्हा एकदा केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकास्त्र डागलं आहे. "सत्ताधारी पक्षाचे ध्येय कोणत्याही किंमतीत सत्ता मिळवणे आहे. भाजपाच्या कोणत्याच कृतीत हिंदूत्व दिसत नाही", असंही ते म्हणाले. पॅरिसमधील सायन्सेस पीओ युनिव्हर्सिटी येथे शनिवारी झालेल्या संवादात ते बोलत होते. या संवादाचा व्हिडीओ राहुल गांधींनी आज प्रदर्शित केला.**



### हिंदू राष्ट्रवाद चुकीचा शब्द

» "मी गीता वाचली आहे. मी अनेक उपनिषदे वाचली आहेत. मी अनेक हिंदू पुस्तके वाचली आहेत; भाजप जे काही करते त्यामध्ये काहीही हिंदू नाही, अगदी काहीच नाही", असं राहुल गांधी म्हणाले. "मी कोणत्याही हिंदू पुस्तकात वाचले नाही किंवा कोणत्याही विद्वान हिंदू व्यक्तीकडून ऐकले नाही की तुम्ही दहशत माजवा, तुमच्यापेक्षा दुर्बल लोकांचे नुकसान करा. त्यामुळे हिंदू राष्ट्रवाद हा चुकीचा शब्द आहे. ते हिंदू राष्ट्रवादी नाहीत. त्यांचा हिंदू धर्माशी काहीही संबंध नाही. ते कोणत्याही किंमतीत सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत आणि सत्ता मिळवण्यासाठी ते काहीही करतील", असंही राहुल गांधी म्हणाले.

या संवादात राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रा, भारताच्या लोकशाही संरचनेचे रक्षण करण्यासाठी विरोधी आघाडीची लढाई आणि इतर महत्त्वाच्या गोष्टींसह बदलती जागतिक व्यवस्था, समस्या याबाबत चर्चा केली. विरोधी पक्ष भारताच्या आत्म्यासाठी लढण्यासाठी कटिबद्ध आहे. सध्या सुरू असलेल्या अशांतेतून देश बाहेर येईल, असाही विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. "मी गीता वाचली आहे. मी अनेक उपनिषदे वाचली आहेत.

मी अनेक हिंदू पुस्तके वाचली आहेत; भाजप जे काही करते त्यामध्ये काहीही हिंदू नाही, अगदी काहीच नाही", असं राहुल गांधी म्हणाले. "मी कोणत्याही हिंदू पुस्तकात वाचले नाही किंवा कोणत्याही विद्वान हिंदू व्यक्तीकडून ऐकले नाही की तुम्ही दहशत माजवा, तुमच्यापेक्षा दुर्बल लोकांचे नुकसान करा. त्यामुळे हिंदू राष्ट्रवाद हा चुकीचा शब्द आहे. ते हिंदू राष्ट्रवादी नाहीत. त्यांचा हिंदू धर्माशी काहीही संबंध नाही.

ते कोणत्याही किंमतीत सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत आणि सत्ता मिळवण्यासाठी ते काहीही करतील", असंही राहुल गांधी म्हणाले.

भारतात लोकशाहीवर हल्ला होत आहे, विरोधी पक्षाचा आवाज दाबला जात आहे आणि स्वायत्त संस्था काबीज केल्या जात आहेत, असाही आरोप त्यांनी केला. भारत-इंडिया वादावर ते म्हणाले की, संविधानात भारताची व्याख्या "भारत म्हणजे इंडिया, राज्यांचे संघटन" अशी केली आहे.

म्हणून, ही राज्ये भारत किंवा इंडिया बनवण्यासाठी एकत्र आली आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे या राज्यांमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व लोकांचा आवाज मोठ्याने आणि स्पष्ट ऐकला जातो आणि कोणताही आवाज दाबला जात नाही किंवा घाबरवला जात नाही.

---

# मोदींनी G20 चे अध्यक्षपद ब्राझीलकडे सोपवले!

## » पंतप्रधान मोदींनी UNSC च्या विस्ताराची केली मागणी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**G20 शिखर परिषदेच्या शेवटच्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी G20 चे अध्यक्षपद ब्राझीलच्या राष्ट्रपतींना सुपूर्द केले. त्यांनी लुला दा सिल्वा यांचे अभिनंदनही केले. यासह पंतप्रधानांनी शिखर परिषदेच्या समारोपाची घोषणा केली. ब्राझील पुढील वर्षी G20 परिषदेचे आयोजन करणार आहे.**

शिखर परिषदेच्या शेवटच्या सत्रानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले की, जग बदलत आहे आणि त्यासोबत जगातील संस्थांनाही बदलण्याची गरज आहे. ते म्हणाले- आतापर्यंत यूएनएससीमध्ये जेवढे सदस्य होते तेवढेच सदस्य UNSC स्थापनेच्या वेळी होते. कायमस्वरूपी देशांची संख्या वाढली पाहिजे. यानंतर ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष म्हणाले की, गरीब देशांच्या कर्जाच्या समस्येकडे लक्ष द्यावे लागेल. भूक संपवण्यासाठी जगाला प्रयत्न वाढवावे लागतील. तत्पूर्वी तिसऱ्या अधिवेशनादरम्यान जाहीरनाम्याला औपचारिक मान्यता देण्यात आली. शिखर परिषदेपूर्वी ब्राझील आणि इंडोनेशियाच्या राष्ट्रपतींनी पंतप्रधान मोदींना रोपटे भेट दिली.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन व्हिएतनाम दौऱ्यावर रवाना झाले आहेत. G20 शिखर परिषदेच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली अर्पण करून झाली. G20 नेते आणि भेट देणाऱ्या देशांच्या नेत्यांनी राजघाटावर पोहोचून राष्ट्रपिता यांना आदरांजली वाहिली. पंतप्रधान मोदींनी सर्व नेत्यांचे खादीची शाल देऊन स्वागत केले. राजघाटाची माहितीही सर्व



### आफ्रिकन युनियनचे G20 सदस्यत्व

» शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात भारताने आफ्रिकन युनियनला G20 चा स्थायी सदस्य बनवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. पंतप्रधान मोदींनी अध्यक्ष म्हणून सर्व देशांच्या संमतीने तो मंजूर करताच आफ्रिकन युनियनच्या प्रमुख अजली असोमनी यांनी जाऊन पंतप्रधान मोदींना मिठी मारली. भारताच्या प्रस्तावाला चीन आणि युरोपीय संघानेही पाठिंबा दिला होता. आफ्रिकेतील 55 देशांना संघाचे सदस्यत्व मिळाल्याचा फायदा होणार आहे.

नेत्यांना देण्यात आली. यानंतर सर्व नेते भारत मंडपममध्ये परतले. त्यानंतर वन फ्युचर या विषयावर शेवटचे सत्र होईल. शेवटी नवी दिल्ली घोषणा जारी केली जाईल. शिखर परिषदेच्या पहिल्या दिवशी अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. रशिया-युक्रेन युद्धानंतर G20 ची पहिली संयुक्त घोषणा बाहेर आली. याशिवाय भारत, युरोप आणि मध्य पूर्व यांच्यातील अत्यंत महत्त्वाच्या आर्थिक कॉरिडॉरवरही करार झाला. यानंतर सर्व पाहुण्यांनी राष्ट्रपतींच्या डिनरला हजेरी लावली. अनेक पाहुणे भारताच्या पारंपरिक पोशाखात दिसले. शनिवारी दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदींनी अध्यक्ष या नात्याने सर्व सदस्य देशांच्या संमतीने नवी दिल्ली जाहीरनामा मंजूर केला. घोषणा मंजूर झाल्यानंतर परराष्ट्र मंत्री एस जयशंकर म्हणाले – सर्व देशांनी नवी दिल्ली घोषणा स्वीकारली आहे. G20 हे राजकीय विषयांवर चर्चा करण्याचे व्यासपीठ नाही यावर सर्व नेत्यांचे एकमत झाले आहे. युक्रेन युद्धाचा उल्लेख जाहीरनाम्यात 4 वेळा करण्यात आला आहे. जयशंकर यांना दहशतवाद आणि G20 मध्ये आफ्रिकन युनियनच्या समावेशावरही प्रश्न विचारण्यात आले. यावर परराष्ट्र मंत्री म्हणाले- तुम्ही या शिखर परिषदेची बाली शिखर परिषदेशी तुलना करू नका. वर्षभरापूर्वी ते बाली होते, आता नवी दिल्ली आहे. युक्रेनचा मुद्दा आणि अन्न सुरक्षा यांसारख्या मुद्द्यांचा 7 परिच्छेदांमध्ये उल्लेख करण्यात आला आहे. मोदींनी जकार्ता आणि त्यापूर्वी (त्यांनी युक्रेनचे नाव घेतले नाही) त्यांच्या सहकारी नेत्यांशीही चर्चा केली होती. आफ्रिकन युनियनचे अध्यक्ष (सेनेगलचे अध्यक्ष) यांनी गेल्या वर्षी बाली येथे मोदींची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी मोदींना सांगितले की, आम्हाला जी-20 मध्ये स्थान का मिळत नाही? मला आठवते की पंतप्रधानांनी त्यांना तेव्हा सांगितले होते - मी तुम्हाला नवी दिल्लीत G20 चे सदस्यत्व मिळवून देण्याची हमी देतो. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या अनुपस्थितीबाबतही जयशंकर यांना विचारण्यात आले.

## शोभिताला भावनिक दृश्ये करण्यात अडचण

शोभिता धुलिपाल सध्या मेड इन हेव्हन सीझन 2 मुळे चर्चेत आहे. याआधी तिची 'द नाईट मॅनेजर' ही वेबसिरीज आली होती. या दोन्हींमधील तिच्या कामाला खूप पसंती मिळाली. शोभिताने दैनिक भास्करला दिलेल्या मुलाखतीत या दोन वेब सिरीजच्या शूटिंगदरम्यानचे काही किस्से शेअर केले आहेत. शोभिता म्हणाली की, शूटिंगदरम्यान असे अनेक सीन आले होते, ज्यांच्या चित्रीकरणात खूप अडचणी आल्या. विशेषतः भावनिक दृश्ये. शोभिता म्हणाली की ती खूप भावुक व्यक्ती आहे, तिला आपले अश्रू आवरता येत नाहीत. शोभिताने असेही सांगितले की, तिला मातृत्वाचा आनंद घेण्याची खूप आवड आहे. शोभिताला लग्नानंतर एक चांगली आई व्हायचे आहे. समांथाचा माजी पती नागा चैतन्यसोबतच्या नात्यामुळे शोभिता काही काळापासून चर्चेत आहे. तथापि, तिने कधीही याला दुजोरा दिलेला नाही. मुलाखतीदरम्यान शोभिता धुलिपालला 'द नाईट मॅनेजर' आणि 'मेड इन हेवन'च्या यशाबद्दल विचारण्यात आले तेव्हा ती म्हणाली, 'आमच्या मुख्य प्रवाहातील सिनेमात अशा पात्रांना प्रेक्षक पटकन स्वीकारत नाहीत, म्हणून जेव्हा अशी पात्रे मला मिळतात. प्रशंसा होते, माझ्या आतल्या अभिनेत्रीला खूप आनंद वाटतो. पुढे, जेव्हा तिला कठीण सीन्समधील तिच्या अभिनयाबद्दल विचारण्यात आले तेव्हा ती म्हणाली, 'मी खूप भावनिक आणि एक्सप्रेस होणारी आहे, मी सहज रडते. तथापि, जेव्हा मला पात्रे व्यक्त करावी लागत नाहीत आणि मला 'होल्ड' करावे लागते तेव्हा ते माझ्यासाठी अवघड होते. शोभिता धुलिपाल तिच्या संघर्षाबद्दल म्हणाली, 'मी माझ्या सर्वात वाईट काळातून शिकले आहे. मी चांगला काळ विसरते. एक अभिनेत्री असल्याने तुमच्यासाठी प्रेक्षकांशी जोडले जाणे खूप महत्त्वाचे आहे. जर अभिनय हा फक्त अभिव्यक्तीचा विषय असेल तर तुम्ही ते घरीही करू शकता. शोभिताला विचारण्यात आले की, ती कठीण परिस्थितीतही धैर्य कसे राखते? प्रत्युत्तरात तो म्हणाला- 'आपण सर्वजण एक दिवस मरणार आहोत, काहीही झाले तरी. आयुष्यात बऱ्याच गोष्टी बरोबर गेल्या आहेत, त्यामुळे आत्ता काही चुकल्यासारखे वाटले तरी कदाचित आठवडाभराने मागे वळून पाहिल्यावर वाईट वाटणार नाही. प्रत्येक व्यक्तीची इच्छा असते, शोभिताची इच्छा चांगली आई बनण्याची आहे. ती म्हणाली- ज्या दिवशी मी आई होईल, मला खूप आनंद होईल. शोभिता धुलिपाल पुढे म्हणाली - विद्या बालनने एकदा माझ्या कामाचे खूप कौतुक केले होते.



## करीनानं केला राष्ट्रगीताचा अपमान!

बॉलिवूडची लोकप्रिय अभिनेत्री करीना कपूर खान ही सध्या तिच्या आगामी ओटीटी पदार्पणासाठी चर्चेत आहे. करीना ही तिच्या फॅशन सेन्स आणि स्टाइल स्टेटमेंटसाठी ओळखली जाते. बेबोला बॉलिवूडमध्ये तिच्या स्वॅग आणि रॉयल्टीसाठी ओळखलं जातं. मात्र बऱ्याचदा ती असं काही करते की तिच्या कृतीमुळं तिला ट्रोल व्हावं लागतं असचं काही यावेळी देखील करीनाने केले आहे. करीना अलीकडेच एका कार्यक्रमात सहभागी झाली होती. तिथे तिने रेड कलर फ्री साइज लूज कुर्ता आणि लुंगी स्टाइल स्कर्ट कॅरी केला होता. या प्लेन रेड कुर्त्यावर हेवी एम्ब्रॉयडरी नेक स्टाइल होती. यावेळी ती खुपच सुंदर दिसत होती. मात्र यावेळी तिने एक चूक केली त्यामुळे ती नेटकऱ्यांच्या निशाण्यावर आली आहे. तिचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खुप व्हायरल होत आहे. या व्हिडिओत ती राष्ट्रगीत गाताना दिसली आहे. मात्र तिचे हावभाव आणि हलचालीने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. राष्ट्रगीत म्हणताना करीना कपूर सर्व महिलांसोबत उभी दिसली.नंतर तिने आपले दोन्ही हात पकडले, जे पाहून लोकांनी तिला ट्रोल करण्यास सुरुवात केली. मात्र असं करणारी करिना एकटीच नव्हती मात्र तरीही नेटकऱ्यांनी तिच्यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. एका नेटकऱ्याने लिहिले की तिला कुणीतरी सांगा की लोक राष्ट्रगीत गातांना सावधान स्थीतीत उभे राहतात. हात धरून नाही. तर एकानं लिहिलं, राष्ट्रगीत सरळ उभे राहून गायले जाते. तर दुसऱ्याने लिहिलं की, स्टार्सना हे कळत नाही हे खूप लज्जास्पद आहे. सध्या करिनाचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. करीनाच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झाल्यास करीना कपूर लवकरच 'जाने जान' चित्रपटात दिसणार आहे. यात त्याच्यासोबत जयदीप अहलावत आणि विजय वर्मा दिसणार आहेत.



## उर्फीची फॅशन पाहून नेटकरी थक्क

कधी लहान मुलांची खेळनी तर कधी बबलगम, कधी कंगवा तर कधी माशांपासून बनवलेला टॉप. ही सर्व फॅशन आहे उर्फी जावेदची. ती नेहमीच तिच्या असामान्य शैली चाहत्यांच्या चकित करत असते. तिची फॅशन ही कल्पनेपलीकडची आहे. उर्फी जावेद ही दररोज कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रसिद्धीच्या झोतात येते. कधी तिची अतरंगी फॅशन तर कधी तिचे वक्तव्य. या दोन्हीमूळे तिच्यावर टीकीही केली जाते. मात्र या टीकेचा तिच्यावर काहीच फरक पडत नसल्याचं नेहमीच दिसतं. उर्फी प्रत्येक वेळी अशी काहीतरी वेगळी फॅशन करते की ते पाहिल्यानंतर नेटकरी हैराण होतात. यावेळीही उर्फीने अशीच काहीशी फॅशन केली आहे. मात्र यावेळी तिने परिधान केलेल्या ड्रेसचं नेटकरी कौतुक करत आहेत. उर्फी जावेद एक क्रिएटिव्ह ड्रेस परिधान केला आहे. यावेळी उर्फीने 7 कॉलर पिंक ड्रेस घातला आहे. ज्याचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या ड्रेसमध्ये ती खूपच सुं द र दिसत आहेया ड्रेससोबतच तिने फ्रेंच स्टाइल हेअरस्टाइल केली आहे. ती मुंबईच्या रस्त्यांवर निघाली तेव्हा ती या लूकमध्ये स्पॉट झाली होती. उर्फी जावेदने हाय हिल्स, हेअर बन आणि न्यूड मेकअपसह तिचा लुक पूर्ण केला होता.

उर्फीच्या क्रिएटिव्हीचं लोक कौतुक करत आहे. तिचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

## गोपी बहू पुन्हा परतणार!

'साथ निभाना साथियाँ' या मालिकेत 'गोपी बहू'ची भूमिका साकारून अभिनेत्री देवोलिना भट्टाचार्जी ही घराघरात पोहोचली. मालिका संपल्यानंतरही देवोलिना विविध कारणांमुळे सोशल मीडियावर सतत चर्चेत असते. देवोलिनाने जीम ट्रेनर शहनवाज शेख याच्यासोबत लग्नगाठ बांधली. यानंतर सोशल मीडियावर तिला खूप ट्रोलही करण्यात आलं. मात्र देवोलिना ही गेल्या काही दिवसांपासून टीव्हीपासून दूर होती. त्यांमुळे तिचे चाहते तिला मिस करत होते पण आता लवकरच ती एका नवीन शोसह टीव्हीवर ग्रँड एन्ट्री करणार आहे. 'दिल दियां गल्लां' या टीव्ही शोद्वारे ती मोठ्या पडद्यावर परतणार आहे. या मालिकेत दिशा नावाचे नवीन पात्र दाखवणार आहे जे देवोलिना साकारणार आहे.



## सनीच्या चित्रपटातून डेब्यू करणार होती ऐश्वर्या!

सध्या सनी देओल त्याचा ब्लॉकबस्टर चित्रपट गदर 2 च्या यशाचा आनंद घेत आहे. आता अलीकडे अभिनेता त्याच्या बंद पडलेल्या चित्रपटांबद्दल बोलला. एका चित्रपटाचे नाव 'इंडियन' असल्याचे अभिनेत्याने सांगितले. सनीने सांगितले की, या चित्रपटातील गाणी आणि बहुतांश दृश्यांचे चित्रीकरण झाले. मात्र, हा चित्रपट कधीच प्रदर्शित झाला नाही. वास्तविक, नुकताच सनी देओल टीव्ही न्यूज शो 'आप की अदालत' मध्ये पाहुणा म्हणून दिसला होता, जिथे तो त्याच्या बंद पडलेल्या चित्रपटाबद्दल बोलत होता. सनी म्हणाला- 'मी स्वतः 'इंडियन' चित्रपट बनवत होतो. ऐश्वर्या राय या चित्रपटाचा एक भाग होती, हा तिचा पहिला चित्रपट होता. आम्ही गाणी आणि बहुतांश सीन शूटही केले होते. पण नंतर बजेटची अडचण सुरू झाली, त्यामुळे चित्रपट अखेर बंद झाला. ऐश्वर्या रायने 1997 मध्ये मणिरत्नमच्या 'इरुवर' या तमिळ चित्रपटातून तिच्या अभिनय करिअरची सुरुवात केली होती. त्याच वर्षी अभिनेत्रीने 'और प्यार हो गया' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात ऐश्वर्यासोबत सनी देओलचा धाकटा भाऊ बॉबी देओल मुख्य भूमिकेत होता. यापूर्वी बॉलीवूड हंगामाला दिलेल्या मुलाखतीत डिझायनर नीता लुल्ला यांनी सांगितले होते की, चित्रपट निर्माते यश चोप्रा यांना 1993 मध्ये आलेल्या डर या चित्रपटात ऐश्वर्या रायला कास्ट करायचे होते, परंतु तसे होऊ शकले नाही.

# गॉफने पटकावले विजेतेपद!



## » कारकिर्दीतील पहिले ग्रँडस्लॅम; साबलेंकाचा पराभव

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**अमेरिकेच्या युवा टेनिसपटू कोको गॉफने शनिवारी यूएस ओपनच्या अंतिम फेरीत बेलारूसच्या अरिना सबालेन्काचा पराभव करून यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले. 19 वर्षीय गॉफच्या कारकिर्दीतील हे पहिले ग्रँडस्लॅम जेतेपद आहे.**

पहिला सेट गमावल्यानंतर गॉफने शानदार पुनरागमन करत सामना 2-6, 6-3, 6-2 असा जिंकला. हे विजेतेपद पटकावणारी गॉफ 2017 नंतरची पहिली अमेरिकन खेळाडू ठरली आहे. यापूर्वी हा पराक्रम सोलन स्टीफनने 2017 मध्ये केला होता. 1999 नंतर यूएस ओपन जिंकणारी गॉफ हा पहिला अमेरिकन किशोरवयीन खेळाडू आहे. सेरेना विल्यम्सने 1999 मध्ये ही कामगिरी केली होती. सामन्यानंतर पुरस्कार सोहळ्यात गॉफ म्हणाली, 'माझ्यासाठी हे खूप महत्वाचे आहे.

या विजयाचे मला अजूनही आश्चर्य वाटते. गेल्या वर्षी फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत हरणे माझ्यासाठी खूप निराशाजनक होते. त्याच्यामुळेच आज मी हा विजय मिळवू शकले आहे. अमेरिकेचा राजीव राम आणि ब्रिटनचा जो सॅलिसबरी या जोडीने शुक्रवारी भारताच्या रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू एबडेन यांचा पराभव करून यूएस ओपन पुरुष दुहेरीचे विजेतेपद पटकावले. यासह राजीव आणि सॅलिसबरी ही जोडी सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावणारी पहिली जोडी ठरली आहे.राजीव राम आणि ब्रिटनच्या जो सॅलिसबरी जोडीने अंतिम फेरीत 2-6, 6-3, 6-4 असा विजय मिळवला. तथापि, 43 वर्षे आणि 6 महिने वयाच्या बोपण्णाच्या नावावर ग्रँड स्लॅम अंतिम फेरीत पोहोचणारा सर्वात वयस्कर खेळाडू होण्याचा विक्रम आहे. बोपण्णा तब्बल 13 वर्षांनंतर या ग्रँडस्लॅमच्या अंतिम फेरीत पोहोचला होता. यापूर्वी 2010 मध्ये फायनल झाली होती. तेव्हा बोपण्णाचा साथीदार पाकिस्तानचा ऐसाम-उल-हक कुरेशी होता. ग्रँडस्लॅम पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत पोहोचण्याची बोपण्णाची ही दुसरी वेळ आहे.

### या विजयाचे मला आश्चर्य

» अमेरिकेच्या युवा टेनिसपटू कोको गॉफने शनिवारी यूएस ओपनच्या अंतिम फेरीत बेलारूसच्या अरिना सबालेन्काचा पराभव करून यूएस ओपनचे विजेतेपद पटकावले. 19 वर्षीय गॉफच्या कारकिर्दीतील हे पहिले ग्रँडस्लॅम जेतेपद आहे. पहिला सेट गमावल्यानंतर गॉफने शानदार पुनरागमन करत सामना 2-6, 6-3, 6-2 असा जिंकला. हे विजेतेपद पटकावणारी गॉफ 2017 नंतरची पहिली अमेरिकन खेळाडू ठरली आहे. यापूर्वी हा पराक्रम सोलन स्टीफनने 2017 मध्ये केला होता. 1999 नंतर यूएस ओपन जिंकणारी गॉफ हा पहिला अमेरिकन किशोरवयीन खेळाडू आहे. सेरेना विल्यम्सने 1999 मध्ये ही कामगिरी केली होती. सामन्यानंतर पुरस्कार सोहळ्यात गॉफ म्हणाली, 'माझ्यासाठी हे खूप महत्वाचे आहे. या विजयाचे मला अजूनही आश्चर्य वाटते. गेल्या वर्षी फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत हरणे माझ्यासाठी खूप निराशाजनक होते. त्याच्यामुळेच आज मी हा विजय मिळवू शकले आहे.

# वर्ल्डकप तिकीट बुकिंगमुळे काळाबाजार!

## » 57 लाखांमध्ये काळ्या बाजारात तिकीटांची विक्री

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**माजी क्रिकेटपटू व्यंकटेश प्रसाद यांनी एकदिवसीय विश्वचषकाच्या तिकीट बुकिंग प्रक्रियेवर सडकून टीका केली आहे. सोशल मीडियावर ते म्हणाले- 'बीसीसीआयने चांगली तिकीट बुकिंग व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून खरे चाहते मैदानात येऊन संघाला पाठिंबा देऊ शकतील. विश्वचषकाचे आयोजन करणे ही राष्ट्रीय अभिमानाची बाब आहे, परंतु आम्ही तिकिटांमध्ये पारदर्शकता न दाखवून काळ्या बाजाराला प्रोत्साहन देत आहोत.**

व्यंकटेश प्रसाद यांनी शनिवारी संध्याकाळी 4 वाजता सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर 2 ट्विट करून बीसीसीआय व्यवस्थापनावर टीका केली. शुक्रवारी त्यांनी आशिया कपमधील भारत-पाकिस्तान सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्याच्या निर्णयाला विरोध केला होता. व्यंकटेश प्रसाद यांनी लिहिले की, आम्ही विश्वचषकाची उभारणी बिघडवली आहे. कोणतेही कारण नसताना वेळापत्रकास विलंब, त्यानंतरही 9 सामन्यांचे वेळापत्रक बदलणे. हे पुरेसे नव्हते आता तिकीट बुकिंगमध्ये पारदर्शकतेचा अभाव आणि अत्यंत संथ प्रणालीमुळे पूर्णपणे काळ्या बाजाराला चालना मिळाली. विश्वचषकाचे आयोजन करणे हा देशासाठी अभिमानाचा क्षण आहे आणि तिकीट बुकिंगची प्रक्रिया चाहत्यांसाठी तितकीच सुरळीत असायला हवी होती. पण चाहत्यांना जेवढा त्रास सहन करावा लागला, तेवढेच विचारपूर्वक केलेले नियोजन दिसते.

मंडळाच्या या नाकर्तेपणाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. प्रसादने पुढे लिहिले की, 'आमच्याकडे चांगली टीम आहे आणि टीम वर्ल्ड कपची दावेदारही आहे. पण आम्हाला स्टेडियममध्ये पाठिंबा देण्यासाठी खऱ्या चाहत्यांची गरज आहे. त्यांच्यासाठी सुविधा (तिकीट बुकिंग) खूप सोपी आणि सोपी असायला हवी होती, पण तसे झाले नाही. बीसीसीआयने चाहत्यांसाठी चांगल्या सुविधा द्याव्यात. विश्वचषकात आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केले जात आहे आणि एक देश म्हणून आपण कोणत्याही स्तरावर कमकुवत दिसू शकत नाही. विश्वचषक स्पर्धेतील गट टप्प्यातील सामन्यांची सर्व तिकिटे विकली गेली आहेत. तिकीट बुकिंग वेबसाइटवर फारच कमी तिकिटे विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे अनेक चाहत्यांनी सांगितले होते. त्यामुळे त्याला तिकीट काढता आले नाही. तिकीट विक्रीचा प्रारंभिक टप्पा 3 सप्टेंबर रोजी संपल्यानंतर, बीसीसीआयने 8 सप्टेंबर रोजी 4 लाख अतिरिक्त तिकिटे जारी केली.

मात्र यामध्येही चाहत्यांना सुरळीतपणे तिकिटे खरेदी करता आली नाहीत. भारताच्या सर्व 9 गट टप्प्यातील सामन्यांची तिकिटे विक्री सुरू झाल्यानंतर लगेचच विकली गेली. त्यानंतर भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे 19 ते 57 लाख रुपयांपर्यंत काळ्या बाजारात विकली जात असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. भारताच्या उर्वरित सामन्यांची तिकिटेही महागड्या दरात विकली जाऊ लागली. व्यंकटेश प्रसाद यांनीही तिकीटाच्या प्रश्नापूर्वी शुक्रवारी आशिया चषकातील भारत-पाकिस्तान सामन्यासाठी राखीव दिवस ठेवण्याच्या निर्णयाला विरोध केला. तो म्हणाला, 'कोणत्याही बहुराष्ट्रीय स्पर्धेत केवळ एका सामन्यासाठी राखीव दिवस ठेवू नये. उर्वरित दोन संघांनी याचा निषेध करून स्पर्धेवर बहिष्कार टाकावा.

वास्तविक, श्रीलंका आणि पाकिस्तानमध्ये खेळल्या जाणाऱ्या आशिया कपच्या सुपर-4 टप्प्यातील सामन्यांवर पावसाचा धोका आहे. ग्रुप स्टेजमधील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता. हे पाहता ब्रॉडकास्टर्सच्या दबावाखाली एसीसीने फक्त भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यासाठी राखीव दिवस ठेवला. 10 सप्टेंबर रोजी दोघांमध्ये सामना होणार आहे, जर पावसामुळे सामना पूर्ण झाला नाही तर सामना 11 सप्टेंबर रोजी त्याच ठिकाणाहून सुरू होईल आणि 10 तारखेला संपेल.



### आम्ही विश्वचषक बिल्डअप खराब केला

» व्यंकटेश प्रसाद यांनी लिहिले की, आम्ही विश्वचषकाची उभारणी बिघडवली आहे. कोणतेही कारण नसताना वेळापत्रकास विलंब, त्यानंतरही 9 सामन्यांचे वेळापत्रक बदलणे. हे पुरेसे नव्हते आता तिकीट बुकिंगमध्ये पारदर्शकतेचा अभाव आणि अत्यंत संथ प्रणालीमुळे पूर्णपणे काळ्या बाजाराला चालना मिळाली. विश्वचषकाचे आयोजन करणे हा देशासाठी अभिमानाचा क्षण आहे आणि तिकीट बुकिंगची प्रक्रिया चाहत्यांसाठी तितकीच सुरळीत असायला हवी होती. पण चाहत्यांना जेवढा त्रास सहन करावा लागला, तेवढेच विचारपूर्वक केलेले नियोजन दिसते. मंडळाच्या या नाकर्तेपणाविरुद्ध आवाज उठवला पाहिजे.